**क्रमांक : ११९८५ /ई-१ कक्ष**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई-४०००३२.
**दिनांक : ३ सप्टेंबर, २०२०**

## : : परिपत्रक : :

**विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२० च्या तृतीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित स्वीकृत प्रश्न फेरविचारांती अतारांकित केल्याबाबत..**

**संदर्भ : (१) संसदीय कार्य विभागाचे पत्र क्र.विमंअ-२०२०/प्र.क्र.७३/पाच, दिनांक ११ ऑगस्ट, २०२०**
**(२) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक : १११५०/ई-१ कक्ष, दिनांक १७ ऑगस्ट, २०२०**

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, संसदीय कार्य विभागाच्या संदर्भ क्र.१ वरील दिनदर्शिकेनुसार सोमवार, दिनांक ०७ सप्टेंबर, २०२० ते १८ सप्टेंबर, २०२० या कालावधीकरिता मा.मंत्र्यांना तारांकित प्रश्नाची उत्तरे देण्याकरिता नेमून देण्यात आलेले दिवस तसेच त्या दिनांकांस निश्चित केलेल्या तारांकित प्रश्नांच्या उत्तराच्या प्रती या सचिवालयास मिळण्याचा अंतिम दिनांक याबाबतची माहिती उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकाद्वारे सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात आली होती. तथापि, मंगळवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२० रोजी महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेचे आगामी तृतीय (पावसाळी) अधिवेशन आता दिनांक ७ व ८ सप्टेंबर, २०२० असे दोन दिवस होणार आहे. सबब, सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० ते १८ सप्टेंबर, २०२० या कालावधीकरिता यापूर्वीच विभागाकडे पाठवण्यात आलेले सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न आता फेरविचारांती अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. अशा सर्व प्रश्नांची उत्तरे विधानपरिषद नियम क्रमांक ७०(२) अन्वये प्रश्न शासनास मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत या सचिवालयास पाठविण्यात यावीत.

**( प्रकाशचंद्र खोंदले )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई प्रत्येकी (तीन प्रती)
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित